# अॅग्रोमेटअॅडवायझरी बुलेटीन
## ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,
## कृषि हवामानशास्त्र विभाग
## कृषि महाविद्यालय, पुणे ४११ ००५

फोन : ०२०-२९५१६२६४

ई-मेल : amfupune@gmail.com


## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १०/०७/२०२६
## जिल्हा : पुणे

| मागील आठवड्यातील हवामान (०४/०७/२०२६ ते १०/०७/२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१०/०७/२०२६ ते १४/०७/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | दिनांक | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 30.5 | 30.7 | 108.4 | 97.5 | 84.8 | 15.1 | 0.1 | पाऊस (मिमी) | 9.0 | 4.0 | 5.0 | 9.0 | 9.0 |
| 26.7 | 25.4 | 25.4 | 24.8 | 27.0 | 25.0 | 30.0 | कमाल तापमान (अं.सें.) | 31 | 32 | 33 | 33 | 33 |
| 22.8 | 22.4 | 22.7 | 22.8 | 23.1 | 22.5 | 24.3 | किमान तापमान (अं.सें.) | 24 | 24 | 23 | 23 | 23 |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | 7 | 8 | 6 | 6 | 8 |
| 98 | 98 | 98 | 92 | 93.0 | 84.0 | 80.0 | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 89 | 86 | 86 | 86 | 86 |
| 92 | 88 | 92 | | 93 | 68 | 65 | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 69 | 68 | 68 | 63 | 65 |
| 6.5 | 5.3 | 2.7 | 5.3 | 5.7 | 7.4 | 9.7 | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 18 | 21 | 24 | 23 | 20 |
| | | | | | | | वाऱ्याची दिशा (अंश) | 261 | 266 | 260 | 261 | 261 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक १० ते १४ जुलै, २०२६ दरम्यान तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम पावसाची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • पुणे जिल्ह्यातील काही भागांमध्ये पेरणी योग्य पाऊस झालेला आहे . त्यानुसार सर्व खरीप पिकांचे पेरणीचे नियोजन करावे. पेरणी पुरेसा ओलाव्यावर व बीज प्रक्रिया करून करावी.<br>• पुणे जिल्ह्यातील ज्या भागांमध्ये अति मुसळधार पावसामुळे शेता मध्ये पाणी साचले असल्यास अतिरिक्त पाण्याचा योग्य त्या प्रकारे निचरा करण्यात यावा.<br>• पुणे जिल्ह्यातील पूर्व भागामध्ये पुरेसा पाऊस झाल्यानंतर खरीप पिकांची पेरणी करावी.<br>• पावसाची शक्यता असल्याने कीटकनाशकाची व बुरशीनाशकाची फवारणी शक्यतो पावसाची उघडीप बघून करावी.<br>• भाजीपाला पीके जसे वांगी, भेंडी, गवार इ. लागवडीनंतर रसशोषक किडींच्या जैविक नियंत्रणासाठी पीकाच्या अवस्थेनुसार पिवळे चिकट सापळे, सापळा पीके, जैविक बुरशीनाशके (मेटारायझीयम, ट्रायकोग्रामा, व्हरटीसिलीयम इ.) यांचा वापर करावा आवश्यकता असल्यास रासायनिक कीड आणि बुरशीनाशकाचा वापर करावा.<br>• हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामा नाच्या पूर्वानुमाना करिता 'मेघदुत' मोबाईल अॅपचा वापर करावा. मेघगर्जना व विजेच्या पूर्वानुमानाकरिता 'दामिनी' मोबाईल अॅपचा वापर करावा.<br>• कृषिविषयक माहितीसाठी, महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषिदर्शनीचा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा. |
| खरीप भात | रोपवाटिका | घाट क्षेत्रात रोपवाटिकेत अतिरिक्त पावसाच्या पाण्याचा निचरा करावा जेणेकरून रोपे पिवळी पडणार नाहीत याची काळजी घ्यावी. २१ ते २४ दिवसांच्या भात रोपांची नियंत्रित पद्धतीने पुनर्लागवड करावी. ज्या भागात उशिरा पाऊस मिळाला आहे तेथे रहू पद्धतीचा अवलंब करावा . भात बियाणे १२ तास पाण्यात भिजवावे व नंतर गोणपाटात झाकून अंधारात ठेवावे. ३६ तासांनी मोड आल्यावर चिखलणी केल्यानंतर रोपवाटीकेसाठी फोकून पेरणी करावी. |
| ऊस | पीक वाढीची अवस्था | ऊस पिकातील अतिरिक्त पावसाच्या पाण्याचा निचरा करावा . खोड किडी च्या जैविक नियंत्र णासाठी ट्रायकोग्रामा चिलोनिस (ट्रायकोकार्ड) ५ ते ६ ट्रायकोकार्ड १५ दिवसाच्या अंतराने प्रति हेक्टरी वापरावे तसेच ५ कामगंध सापळे (इ.एस.बी. ल्यूर) प्रति हेक्टरी वापरावे. |
| कांदा | रोपवाटिका | कांदा पिकाच्या रोपवाटिकेत अतिरिक्त पावसाच्या पाण्याचा निचरा करावा जेणेकरून रोपे पिवळी पडणार नाहीत याची काळजी घ्यावी. |
| सोयाबीन | पेरणी | सोयाबीनची पेरणी पुरेसा ओला व्यावर १५ जुलै पर्यंत वेळेत उरकून घ्यावी . पेरणी करताना बीजप्रक्रिया करून पेरणी करावी. |
| हुमणी कीड | किडीचे नियंत्रण | हुमणीचे भुंगेरे सुर्यास्तानंतर बाभूळ, बोर, लिंब या झाडांवर पाने खाण्यासाठी गोळा होतात. अशा झाडांच्या फांद्या रात्री काठीच्या सहाय्याने हलवून खाली पडलेले भुंगेरे गोळा करावेत व रॉकेल मिश्रित पाण्यात टाकून मारावेत. हा उपाय शेतकऱ्यांनी सामुदायिकरित्या करावा. त्यामुळे अंडी घालण्यापूर्वीच भुंगेऱ्यांचा नायनाट होईल. हुमणी अळीच्या जैविक नियंत्रणासाठी मेटारिझीयम अॅनिसोप्ली परोपजीवी बुरशी २० कि. प्रति हेक्टर जमिनीत मिसळावे (शेणखतामध्ये मिसळून टाकता आल्यास उत्तम). |
| केळी | पीक वाढीची अवस्था | पावसाची शक्यता असल्याने झाडे पडू नयेत म्हणून व वजनाने मोठ्या असलेल्या घडास गरजेप्रमाणे बांबूच्या किंवा पॉलीप्रोपेलीनच्या पाट्यांच्या सह्यायाने झाडांना/ घडांना आधार/ टेकू द्यावा.<br>नवीन लागवड मृग बाग साठी शेत तयार करावे. लागवडीसाठी कंद मुनवे निरोगी आणि जातिवंत बागेतूनच निवडावे. |

| | | |
|---|---|---|
| | | ॲझोस्पिरीलम - २५ ग्रॅम व पी.एस.बी.-२५ ग्रॅम/ झाड, केळी लागवडीच्या वेळी शेणखतात मिसळून द्यावीत. वादळी वाऱ्यापासून बागेच्या संरक्षणासाठी सजीव कुंपणाचा वापर करावा. |
| **आंबा** | पीक वाढीची अवस्था | नवीन लागवड केलेल्या फळबागेतील पाण्याचा निचरा करावा . ज्या बागेत छाटणी झालेली आहे तिथे प्रतिबंधात्मक उपाय म्हणून कीटकनाशक व बुरशीनाशकाची फवारणी करावी. |
| **पपई** | पीक वाढीची अवस्था | पपई बागेतील बागेतील अतिरिक्त पावसाच्या पाण्याचा विचारा करावा . पपई मध्ये पीथियम सॉफ्ट रोगाच्या नियंत्रणासाठी रेडो मिल गोल्ड २ ग्रम प्रति लिटर पाण्यातून आळवणी करावी. |
| **बटाटा** | पीक वाढीची अवस्था | बटाटा पिकाची लागवड झाली असल्यास मर रोगाचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून कॉपर ऑक्सीक्लोराईड या बुरशीनाशकाची २.५ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे शेतात वा पसा असताना आळवणी करावी. तसेच बऱ्याच दिवस पावसाने उघडी प दिल्यावर कोळी किडीचा प्रादुर्भाव होऊ शकतो . त्यामुळे प्रादुर्भाव दिसताच डायफेंथिउरॉन ४७.८० एस सी हे कीटकनाशक १ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणे फवारावे. |
| **अंजीर** | पीक वाढीची अवस्था | अंजीर बागेची खट्टा बहार धरण्यापूर्वी हलकी छाटणी करावी. त्यामुळे रोगग्रस्त फांद्यांची संख्या कमी होते , नवीन फूट जोमाने येते व त्यावर रोगाचा प्रादुर्भाव अत्यल्प असतो. छाटणी केल्यानंतर सर्वप्रथम झाडाखाली व आजूबाजूला पडलेली सर्व रोग्रस्त पाने व फांद्या गोळा करून बागेबाहेर नेऊन नष्ट करावीत. बागेची छाटणी झाल्यावर ताबडतोब संपूर्ण झाडावर व झाडाखाली , जमिनीवर गंधक ३०० मेश २० किलो / हे. याप्रमाणे धुरळणी किंवा २० ग्रॅम पाण्यात मिसळणारे गंधक प्रति १० लि. पाणी याप्रमाणे फवारणी करावी. |
| **जनावरांचे व्यवस्थापन** | | पावसाळयामध्ये जनावरांना सुरक्षित ठिकाणी बांधावे, जनावरांचा गोठा व आसपासचा परिसर स्वच्छ व हवेशीर ठेवावा पावसाचे पाणी गोठ्यात जाऊ नये याची काळजी घ्यावी. गोठ्याभोवती पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी गोठ्यात ओलसरपणा राहणार नाही याची दक्षता घ्यावी गोठे स्वच्छ व कोरडे ठेवावेत चिखल होऊ देऊ नये. हिरव्या चाऱ्या करिता ज्वारी, बाजरी, मका यासारखे पिकांना प्राधान्य द्यावे. याच बरोबर बहुवार्षिक पिकांमध्ये संकरित नेपियर लसूण घास यासारखी पिके घ्यावीत . साठविलेल्या सुक्या चाऱ्यावर पाणी पडून त्यात बुरशी लागली असेल तर असा चारा जनावरांना देऊ नये तो नष्ट करावा . जनावरांचे खाद्य घटक दमट आद्रता युक्त वातावरणात साठवू नयेत त्यामध्ये भिंतीचा जमिनीचा ओलसरपणा मुरणार नाही याची काळजी घ्यावी. |

***टिप : शेतकरीबंधूनी किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्य ती खबरदारी/ काळजी धेऊन किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.**

**महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत उत्पादित होणाऱ्या जिवाणू खतांची माहिती तसेच उपलब्धता ठिकाण कृषि अणुजीवशास्त्रज्ञ, कृषि महाविद्यालय, पुणे-४११००५ फोन नं.: (०२०) २५५३७०३३ विस्तार २३२ किंवा २२८**

**स्त्रोत : १) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.**
**२) मागील हवामान : -**
**ठिकाण : कृ.म.वि., पुणे . दि. : १०.०७.२०२६**

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे,ऐएमएफयु, पुणे तथा**
**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**